महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ अ‍ॅटोमोबाईल टेक्निशियन
■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ मोटार वायडिंग
■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ फोर व्हीलर मेकॅनिक
■ A.C. मेकॅनिक ■ वेल्डर / प्लंबर
■ कॉम्प्युटर ऑपरेटर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य


किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्अ‍ॅप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १०७ वा | शनिवार, दि.२२ नोव्हेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ शिवसेना नेते तथा माजी उपसभापती बाळासाहेब गायकवाड यांचा भाजपात प्रवेश

## मोहोळ नगर परिषदेच्या निवडणुकीत ज्येष्ठ भाजप नेते राजन पाटील पॉवर मोडमध्ये..



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ग्रामविकास तथा पंचायत राज विभागाचे कॅबिनेट मंत्री आणि सोलापूरचे पालकमंत्री ना. जयकुमार गोरे यांनी सुरू केलेले मिशन लोटस दरम्यान यापूर्वी मोहोळचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार राजन पाटील आणि अनगरकर -पाटील परिवाराने प्रवेश केल्यानंतर मोहोळ तालुक्याची राजकीय समीकरणे मोठ्या प्रमाणात बदलली आहेत. येत्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या नगरपरिषद निवडणुकांच्या प्रचाराच्या शुभारंभाच्या निमित्ताने पालकमंत्री ना. गोरे मोहोळमध्ये आले असता त्यांच्या उपस्थितीत मोहोळचे ज्येष्ठ शिवसेना (उबाठा)चे नेते तथा पंचायत समितीचे माजी उपसभापती बाळासाहेब ज्ञानदेव गायकवाड यांनी माजी आमदार राजन पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि जिल्हाध्यक्ष शशिकांतनाना चव्हाण

### शिवसेना उबाठा पक्षाला खिंडार पाडत भाजपची राजकीय सरशी

यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात काल प्रवेश केला. त्यांच्या समवेत गायकवाड परिवारातील शिवसेनेचे युवा नेते असलेले युवा उद्योजक विक्रांत गायकवाड आणि शेती क्षेत्रात नावलौकिक प्राप्त केलेले कृषी उद्योजक वैभवदाजी गायकवाड यांच्यासह बाळासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्व मानणाऱ्या युवा शिवसैनिकांनी देखील प्रवेश केला.

मोहोळ शहरात बाळासाहेब गायकवाड यांच्या परिवाराचा मोठा स्नेह परिवार मोहोळ शहर आणि तालुक्यात आहे. त्यांचे बंधू ज्येष्ठ मार्गदर्शक आणि कृषी उद्योजक विष्णुपंत गायकवाड यांची त्यांना भक्कमपणे साथ आजवर मिळाली आहे. त्यांची सुपुत्र वैभव दाजी गायकवाड आणि पुतणे विक्रांत विष्णुपंत गायकवाड हे देखील सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात यापूर्वीपासूनच कार्यरत आहेत. शिवाय मोहोळ चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष प्रवीणनाना डोके आणि युवा उद्योजक प्रभाकरदादा डोके त्याचबरोबर यापूर्वी राष्ट्रवादीत असलेले आणि सध्या भाजपमध्ये प्रवेश केलेले माजी उपनगराध्यक्ष प्रमोद डोके हे त्यांचे भाच्चे आहेत. तीनच दिवसांपूर्वी भारतीय जनता पक्षाने ज्येष्ठ नेते बाळासाहेब गायकवाड यांच्या भगिनी निलावती द्रोणाचार्य डोके यांना प्रभाग क्रमांक नऊ मधून उमेदवारी दिली आहे. आता त्यांचे सख्खे बंधू बाळासाहेब गायकवाड यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे या प्रभागातील राजकीय समीकरणांमध्ये देखील मोठा सकारात्मक बदल होऊन त्याचा फायदा भाजपाला होणार आहे.

यात्रसंगी ज्येष्ठ नेते राजन पाटील,जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण,ज्येष्ठ नेते नागनाथभाऊ क्षीरसागर जिल्हा उपाध्यक्ष प्रकाशभाऊ चवरे, सुरेश राऊत, तालुकाध्यक्ष सतीश काळे, रमेश माने, निवडणूक प्रभारी सुशीलभैया क्षीरसागर, सोमेश क्षीरसागर, विकास वाघमारे, अंकुश अवताडे, प्रवीणनाना डोके, प्रमोद डोके, ज्येष्ठ नेते तथा भावी जि.प. सदस्य शंकरराव वाघमारे,गुरुराज तागडे,गणेश झाडे, मुजीप मुजावर, विक्रांत गायकवाड, वैभव गायकवाड यांच्यासह भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

नगरपरिषदेचे मतदान केवळ दहा ते बारा दिवसावर येऊन ठेपलेले असताना पक्षांतर्गत नाराजी आणि निर्णय प्रक्रियेत विश्वासात न घेतल्यामुळे नगरपरिषद निवडणूक प्रक्रियेपासून काहीसे दूर राहणार असल्याबाबतची पोस्ट त्यांनी समाजमाध्यमावर काही दिवसापूर्वी शेअर केली होती. तेव्हापासून बाळासाहेब गायकवाड हे कोणत्या पक्षात प्रवेश करणार ? याबाबत मोठी उत्सुकता होती. शिवसेनेच्या या जेष्ठ आणि लढवय्या नेत्याने पालकमंत्री ना. गोरे आणि ज्येष्ठ नेते राजन पाटील यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केल्यामुळे शिवसेना उबाठा शिवसेना पक्षाला मोठा धक्का बसला आहे. मोहोळ शिवसेना वर्तुळात 'भाऊ '' या उपनावाने सर्व शिवसैनिक आणि शहरवासीयांना परिचित असलेल्या बाळासाहेब गायकवाड यांनी गेल्या तीन दशकापासून शिवसेनेच्या संघटन कौशल्याची धुरा सक्षमपणे सांभाळली आहे. शिवाय त्यांनी मोहोळचे सरपंचपद देखील भूषवले आहे. शांत कार्यशैलीबरोबर एक मनमिळाऊ व्यक्तिमत्व म्हणून बाळासाहेब गायकवाड परिचित आहेत त्यांच्या प्रवेशाचा निश्चितपणे मोठा फायदा येत्या काळात होणाऱ्या नगरपरिषद आणि जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांमध्ये भाजपाला होणार आहे.

# मोहोळच्या विकासासाठी निधी मंजूर करून आणण्याचे काम माझं

## तुम्ही सर्वजण फक्त सांगा मोहोळचा कोणता विकास करायचा

### पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे यांचे मोहोळ शहरवासीयांना ठोस आश्वासन

## भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शीतल क्षीरसागर यांच्यासह सर्व उमेदवारांच्या प्रचाराचा मोहोळमध्ये शुभारंभ

**मोहोळ (साहिल शेख):-** मोहोळ तालुक्यासह जिल्ह्यामध्ये माजी आमदार राजन पाटील यांनी भाजपामध्ये प्रवेश केल्याने भाजपाची ताकद वाढली आहे. ज्येष्ठ नेते राजन पाटील यांचे संघटनकौशल्य आणि मोहोळ मतदारसंघाच्या विकासाबद्दल त्यांच्या मनात असली तळमळ पाहूनच पक्षश्रेष्ठींनी त्यांना यापुढील काळात विकासात्मक प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्याबरोबर मोहोळ तालुक्याच्या उर्वरित विकासाचा टप्पा पूर्ण करण्याबाबत सहकार्य करण्याचे अभिवचन दिले आहे. त्यामुळे या निवडणुकीत एकदिलाने कार्यरत राहून भारतीय जनता पक्षाला यश मिळवून द्या. आणि त्यानंतर तुम्ही फक्त काय विकास करायचा आहे हे सांगा ते मंजूर करून आणण्याचे काम मी नक्की करणार आहे '' असे ठोस आश्वासन राज्याचे ग्रामविकास पंचायत राज खात्याचे कॅबिनेट मंत्री तथा पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांनी मोहोळ येथे दिले. मोहोळ नगर परिषदेच्या निवडणुकीतील भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार शितल सुशील क्षीरसागर व अन्य दहा प्रभागातील वीस उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित कार्यकर्ता मेळाव्यामध्ये नामदार गोरे मार्गदर्शन करताना बोलत होते.



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासात्मक जडणघडणीबरोबर देशाला महासत्ता बनवण्यासाठी सातत्याने प्रामाणिक प्रयत्न सुरू ठेवले आहेत त्यामुळे अशा नेत्यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना आम्हा प्रत्येक पदाधिकाऱ्यांना अभिमान वाटायला हवा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि पालकमंत्री ना. जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्ह्याच्या विकासात्मक प्रगतीचा आलेख सातत्याने उंचावत ठेवल्यामुळे त्यांच्या मंत्रीपदाच्या कालावधीत आम्ही अनगरकर पाटील परिवाराने केलेला भाजप प्रवेश निश्चित अविस्मरणीय बाब आहे.मोहोळ शहराचा रखडलेला विकास जर करून घ्यायचा असेल,तर देशामध्ये आणि राज्यामध्ये भाजपाचेच डबल इंजिन सरकार आहे.आता मोहोळ नगर परिषदेच्या माध्यमातून तिसरे इंजन त्याला जोडून शहराच्या विकासाचा बॅकलॉग भरून काढावा.

**- राजन पाटील,** ज्येष्ठ भाजप नेते मोहोळ

यावेळी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार राजन पाटील हे होते तर व्यासपीठावर भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत नाना चव्हाण, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शितल सुशील क्षीरसागर, भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब गायकवाड यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**प्रारंभी पालकमंत्र्यांचे छत्रपती शिवाजी महाराज चौकात आगमन**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून,महबूब सुभानी दर्गा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्य स्मारक,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे,शक्ती देवी यांना अभिवादन करून रॅली काढत मोहोळ शहराचे ग्रामदैवत श्री नागनाथ महाराजांच्या मंदिरामध्ये नारळ फोडून नागनाथ मंगल कार्यालय येथे प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर प्रकाश चवरे, सतीश काळे, प्रतापसिंह गरड, नागनाथभाऊ शिरसागर, सुशिल क्षिरसागर, सोमेश शिरसागर विकास वाघमारे, अंकुश अवताडे, रमेश माने, शंकरराव वाघमारे, बाळासाहेब गायकवाड, आदींसह तालुक्यातील भाजपाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

**कामे बोलून होत नसतात त्यासाठी काम करावं लागतं... चकाकणारे सगळे सोने नसते**

फक्त बोलून विकास होत नाही.त्यासाठी कामे करावी लागतात. सगळ्याच चांगल्या दिसणाऱ्या गोष्टी सुंदर असतात असे नाही.सोन्यासारखं दिसणारे बेन्टेक्स फक्त चमकण्याचा आव आणतं म्हणून ते सोने नसतं.'' असा खुमासदार टोला आपल्या भाषणातून नामदार जयकुमार गोरे यांनी भाजपला विरोध करणाऱ्या तालुक्यातील अतिहुशार चाणाक्ष नेत्यांना लावल्यानंतर सभास्थळी पालकमंत्र्यांच्या भाषण कौशल्याला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भरभरून दाद दिली.

# सत्ताधारी आणि विरोधकांच्या विकासकामातील साटेलोट्यामुळेच एकेकाळच्या प्रगत प्रभागाची अधोगती

## एकाधिकारशाहीच्या कारभारामुळे निधीचा अपवव्य होऊन प्रभाग बकाल बनल्यानेच शिवसेना शिंदे पक्षाच्या माध्यमातून निवडणुकीच्या रिंगणात



### प्रभाग ८ मधील शिवसेना शिंदे पक्षाचे अधिकृत उमेदवार दौलतराव तथा बंडू देशमुख यांची स्पष्टोक्ती

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहराच्या पश्चिम भागातील राजकीय दृष्ट्या चर्चेत असलेल्या प्रभाग क्रमांक आठ मधील राजकारण बदलणे हा माझा आणि आमच्या शिवसेना शिंदे पक्षाचा मुळीच हेतू नाही. तर केवळ कागदोपत्री विकासकामाच्या जोरावर सर्वसामान्यांची दिशाभूल करून राजकारणाच्या माध्यमातून वैयक्तिक स्वार्थ साधणाऱ्या राजकीय पक्ष घटकांना या प्रभागातून हद्दपार करणे हेच आमच्या निवडणूक लढवण्याचे रियल मिशन आहे असा घणाघात शिवसेना शिंदे पक्षाचे प्रभाग आठ मधील सर्वसाधारण प्रवर्गातील अधिकृत उमेदवार दौलतराव तथा बंडू देशमुख यांनी केला. निवडणुकीच्या प्रचाराला प्रारंभ करण्यापूर्वी माध्यमांशी बोलताना दौलतराव तथा बंडू देशमुख यांनी आपली निवडणूक लढवण्यामागची भूमिका स्पष्ट केली.

यापूर्वी दोन वेगवेगळ्या पक्षांच्या ताब्यात असलेल्या दोन प्रभागांचा मिळुन प्रभाग नव्याने निर्माण झाला असल्यामुळे दोन्ही प्रभागांच्या विकासाबाबत सर्वसामान्यांमध्ये कोणताही ताळमेळ आजतागायत जाणवला नाही. त्यामुळे प्रभागात कामे केली असे म्हणून सांगणाऱ्या यापूर्वीच्या दोन्ही लोकप्रतिनिधींनी सर्वसामान्यांची मागणी आहे त्या ठिकाणी कामे केली की स्वतःच्या सोयीच्या ठिकाणी कामे केली ? याबाबतही जरा माझ्यासह प्रभागातील सर्व मतदारांना स्पष्टीकरण द्यावे. आज बऱ्याच भागात प्रभागातून पायी सुखरूप घरापर्यंत चालत जाता येईल अशी देखील अवस्था नाही. यावरून आपला पंढरीच्या मार्गावर असलेला सर्वांचा हा प्रभाग नक्की कुठे नेऊन ठेवला आहे याचा बोध होईना झाला आहे.

**- दौलतराव तथा बंडू देशमुख**


शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे अधिकृत उमेदवार (प्रभाग क्रमांक आठ)

प्रभाग क्रमांक आठ हा माझ्यासारख्या स्थानिक उमेदवाराच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. हा प्रभाग कोणत्या पक्षाची बालेकिल्ला स्वरूपातील मक्तेदारी नसून विकासकामे करणाऱ्या आणि सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा निर्णय प्रत्येक मतदार बंधू-भगिनींना विश्वासात घेऊन काम करणाऱ्या स्थानिक भूमिपुत्रांच्या अस्मितेचा विषय आहे. त्यामुळे या प्रभागातील आम्ही स्थानिक पदाधिकारी आणि शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या जिगरबाज शिवसैनिकांनी मिळूनच निवडणूक लढवण्याचा हा निर्णय एकमताने घेत अन्य पक्षांना आव्हान दिले आहे.

# प्रभात दहाचा भाजपचा बालेकिल्ला ताब्यात ठेवण्यासाठी मेजर तानाजी माने यांची प्रचारात निर्णायक सरशी

## प्रभागात पदयात्रेद्वारे मेजर तानाजी माने आणि आरती प्रशांत गाढवे यांनी साधला मतदार बांधवांशी विकास संवाद

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक दहा हा गेल्या अनेक वर्षापासून चा भाजपचा किल्ला ताब्यात ठेवण्यासाठी भारतीय जनता पक्षाने या प्रभागातून मेजर तानाजी माने यांना उमेदवारी देत या प्रभागातील सर्वपक्षीय विरोधकांसमोरचे आव्हान कायम ठेवले आहे. मेजर तानाजी माने यांची सुपुत्र डॉ. किरण माने आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या प्रभागातील प्रचाराचा दुसरा टप्पा आता जवळपास पूर्ण करत आणला आहे. या प्रचाराच्या पहील्याच टप्प्या दरम्यान त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. माने वस्ती, गाढवे वस्ती बरोबर मोहोळ शहराच्या दक्षिण भागातील कुरुल रस्त्याच्या पूर्वेकडील भागातील प्रत्येक नगरामध्ये मेजर तानाजी माने आणि प्रशांत गाढवे यांच्या परिवारातील सदस्यांनी फिरून प्रत्येक सर्वसामान्यांशी संपर्क साधला आहे. देशातील आणि राज्यातील भाजपची विकास धोरणे पटवून देत भाजपच्या उमेदवाराचा विजय झाल्यानंतर





वरिष्ठ स्तरावरून प्रशासकीय योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करता येऊ शकते ही बाब त्यांनी प्रत्येकाला मनोमन पटवून दिली आहे.

या दरम्यान महिला भगिनी त्याचबरोबर सर्व मतदारबांधवांना अत्यंत आपुलकीने संवाद साधत या पुढील काळातही या प्रभागातील विकासधारा ज्येष्ठ नेते माजी आमदार राजन पाटील, जिल्हाध्यक्ष शशिकांत नाना चव्हाण, लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील या प्रभागाचे यापूर्वीचे नगरसेवक आणि सध्याचे भाजप निवडणूक प्रभारी सुशीलभैया क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली अविरतपणे पुढे सुरू राहील असा विश्वास यावेळी मेजर तानाजी माने समर्थक, भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मतदारांना व्यक्त केला आहे.

माने परिवार हा या प्रभागातील एक सुशिक्षित आणि व्यवसाय आणि शेतीदृष्ट्या संपन्न परिवार आहे. त्यामुळे राजकारणाच्या माध्यमातून कोणतीही फायद्याची अपेक्षा न ठेवता अगदी निरपेक्ष भावनेने या प्रभागाची सेवा करू शकणारा परिवार असल्याची बाब ध्यानात घेऊनच ज्येष्ठ भाजप नेते राजन पाटील यांनी या परिवारावर असलेला विश्वास सार्थ ठरवत यांना उमेदवारीची संधी दिली. अनगरकर -पाटील परिवार आणि भाजप पक्षाच्या मार्गदर्शनाखाली या प्रभागाचा पुढील विकासाचा टप्पा पूर्ण करण्यासाठी या निवडणुकीत विजयी होणे महत्त्वाचे आहे.त्यामुळे माने परिवार आणि भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते एकदिलाने प्रचाराचा प्रभागातील जोर चांगलाच वाढवत आहेत. आणि त्यामध्ये त्यांना सकारात्मक प्रतिसाद देखील मिळत आहे.

# निलावती द्रोणाचार्य डोके यांच्या प्रभावी प्रचार यंत्रणेमुळे प्रभाग १० मध्ये भाजपचे जोरदार कमबॅक

## डोके परिवारातील महिला सदस्यांनी साधला प्रभागातील महिला मतदार भगिनींशी सुसवांद

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग १० मधील भाजपच्या सर्वसाधारण प्रवगार्तील अधिकृत उमेदवार निलावती द्रोणाचार्य डोके यांच्या प्रचारार्थ महिलांच्या शिष्टमंडळाने जोरदार आघाडी घेत प्रभागात डोअर टू डोअर संपर्क सुरू केला आहे. या दरम्यान प्रभागातील प्रत्येक नगरातील प्रत्येक घरातील प्रत्येक महिला भगिनींशी संवाद साधत भारतीय जनता पक्षाची विकासधारा आणि विकासाची विचारधारा पटवून देण्यासाठी या महिला भगिनींनी निलावती डोके यांच्या प्रचारार्थ महिला वर्गाच्या संपर्क आणि संवाद भेटीवर भर दिला आहे. प्रभागातील ही अभिनव प्रचार यंत्रणा आणि महिला शिष्टमंडळाच्या महिला भगिनींशी होणाऱ्या संवादशैलीने निलावती डोके यांच्या प्रचारातील सर्वसामान्य मतदार भगिनींचा प्रतिसाद निश्चितपणे वाढत आहे.

उमेदवार असलेल्या निलावती द्रोणाचार्य डोके यांच्या परिवारातील



स्नुषा पुनम प्रवीण डोके, दिपाली द्रोणाचार्य डोके, रूपाली प्रमोद डोके यांचा यापूर्वीपासूनच या प्रभागातील शेकडो महिला भगिनींशी विविध सांस्कृतिक आणि पारंपारिक हळदी कुंकु सणांच्या निमित्ताने होणाऱ्या उपक्रमामुळे नित्य सुसंवाद आणि विस्तृत परिचय आहे. या गोष्टीमुळे या प्रभागातील महिला मतदारांमध्ये भाजपच्या उमेदवाराबद्दलची वैचारिक अनुकूलता निर्माण करण्यामध्ये त्यांना यश मिळत आहे.

डोके परिवारातील महिला सदस्यांचे महिला मतदार भगिनी वर्गाशी असलेल्या स्नेहबंधामुळे या प्रभागातील समर्थ नगर, न्यू समर्थ नगर, शाहीर फाटे नगर त्याचबरोबर डोके वस्ती आणि अन्य नगरांमधील महिला भगिनींशी मोठा संपर्क आहे. त्यामुळे या प्रचारा दरम्यान संवाद साधताना या महिला सदस्यांच्या शिष्टमंडळाला प्रचारादरम्यान परिचय प्रदान करण्याच्या फारशा अडचणी आल्या नाहीत. त्यामुळे सर्वांशी वन टू वन संवाद साधत त्यांनी भारतीय जनता पक्षाला मतदान करण्याबाबत आणि कमळ चिन्हावर सर्वांचे लक्ष केंद्रित होण्यासाठी पक्षाला अभिप्रेत असलेली प्रभावी प्रचार यंत्रणा यशस्वी केली आहे.

## संपादकीय

# कुबड्या नको, स्वबळ हवे!

महाराष्ट्राच्या राजकीय पटावर गेल्या काही आठवड्यांत घडलेल्या घटनांनी एक गोष्ट पुन्हा अधोरेखित केली. भाजपला ‘कुबड्या’ नको आहेत; तेवढ्या पुरत्या हव्या असतात, ते उपयुक्त असतील तोपर्यंतच. अमित शहांनी केलेल्या ‘कुबड्या’ या उल्लेखानंतर राज्यातील राजकारणात अचानक वेग आला, आणि कोण कुणाची कुबडी, कोणाला कोणाचा आधार याचा हिशोब पुन्हा सुरू झाला.

शहांनी वापरलेला शब्द साधा असला तरी त्याची राजकीय पार्श्वभूमी खोल आहे. भाजप स्वबळावर सक्षम होईपर्यंत मित्रपक्षांच्या खांद्यावर हात ठेवतो, आणि सक्षम झाल्यावर तेच खांदे बाजूला सारतो. हे देशातील अनेक राज्यांत २०१४ नंतर पाहायला मिळाले आहे. महाराष्ट्रातही त्याच पद्धतीची पुन्हा पुनरावृत्ती होतेय, हे निर्विवाद.

पुण्यातील जमीन व्यवहार आणि राजकीय भूकंप

पुण्यातील एका जमीन व्यवहाराने भाजपला केंद्रस्थानी आणले आणि चौफेर टीका झाली. प्रश्न एवढाच की, हा आगडोंब दिल्लीपर्यंत का गेला? कारण भाजपला आपल्या प्रतिमेवर डाग पडू द्यायचा नाही. दिल्लीने सूत्रे फिरवली आणि काही तासांत प्रकरण शांत केले. हेच दाखवते की राज्यातील सर्व दोरखंड अजूनही दिल्लीच्या हातातच आहेत.

अजित पवार आणि शिंदे : कोणाची कसोटी, कोणाचा खेळ?

प्रथम अजित पवारांच्या कुटुंबीयांवर जमीन घोटाळ्याची छाया उभी करण्यात आली. अजित पवार चाणाक्ष असल्याने ते लगेचच सावरले. पण एकनाथ शिंदेंची ही कसोटी नुकतीच सुरू झाली आहे. गेल्या काही महिन्यांत त्यांच्या गटातील अनेक नेत्यांवर आरोपांची मालिका सुरूच आहे. शिंदे यांच्या दिल्लीवाऱ्या वाढल्या, पण त्यातून त्यांच्या सत्तेबाबतचा आत्मविश्वास मात्र घटत चालल्याचे स्पष्ट दिसले.

भाजपने महापालिका निवडणुकांच्या तोंडावर शिंदे गटातीलच नेत्यांना उचलण्यास सुरुवात केली. हे शिंदेंच्या गोटातील संभाव्य बंडखोरीचे बीज आहे. मुख्यमंत्रिपद सुटले आणि उपमुख्यमंत्रीपदावर डिमोशन मिळाल्यापासून शिंदेंचा दरारा कमी होणे अपरिहार्यच होते.

एकत्र लढायचे? की एकमेकांवरच लढायचे?

महायुती ‘एकत्र लढणार’ हा नारा तोंडावर आहे. पण प्रत्यक्षात मुंबई वगळता कुठेही एकत्र लढण्याची भाजपची तयारी नाही, कारण त्यांची गरजच नाही. भाजपला स्वबळ वाढवायचे आहे; साथीदारांना वाढवायचे नाही. त्यांनी गेल्या दहा वर्षांत देशभरात जे केले. मित्र वापरायचे, मग टाकायचे, तेच महाराष्ट्रातही दिसू लागले आहे.

**बिहारचा धडा, महाराष्ट्रातील पुनरावृत्ती**

बिहारमध्ये नितीश कुमार यांच्या कुबडीचा वापर भाजप यशस्वीरीत्या करू शकला नाही. नितीश यांनी त्यांच्या पलट्या भाजपला चांगल्याच लक्षात राहिल्या. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत भाजपने अशी तयारी केली की नितीश परत पलटी मारली तरी त्यांची सत्ता धोक्यात येऊ नये. महाराष्ट्रातही हाच गणिती डाव सुरू आहे.

स्थानिक निवडणुकांत स्वतःची टक्केवारी किती वाढते याची चाचपणी करून भाजप एकदा खात्री करेल आणि मग ‘कुबड्या’ दूर ठेवल्या जातील, हे फारसं लपून राहिलेलं नाही.

**राजकारणातील कुबड्या : उपयोग होईपर्यंतच!**

सत्तेच्या मार्गावर राजकीय कुबड्या हा नवा प्रकार नाही. पण आजच्या राजकारणात त्या केवळ ‘वापरून टाकायच्या’ वस्तू बनल्या आहेत. भाजपचे धोरण स्पष्ट आहे : सत्तेचा मार्ग अडला तर कुबडी घ्यायची.मार्ग मोकळा झाला की कुबडी फेकायची. आणि स्पर्धक पुन्हा कुबडी बनेल असे वाटले तर त्याला पंगू करायचे. अशा परिस्थितीत महाराष्ट्रातील मित्रपक्षांचे राजकीय भविष्य किती सुरक्षित राहील? प्रश्न गंभीर आहे आणि उत्तर अधिक गंभीर.

**शेवटचा मुद्दा : महाराष्ट्राला ‘कुबड्यां’चे शासन नको**

महाराष्ट्रात लोकांना स्थिर, स्पष्ट, प्रामाणिक नेतृत्व हवे आहे. सततच्या राजकीय पलट्या, कुबड्या आणि तात्पुरत्या मैत्र्या यातून राज्याचा विकास मंदावतो.

भाजप, शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी (अजित पवार) सर्वच पक्षांनी ‘कुबड्या’ हा शब्द सोडून लोकशाहीचा खरा अर्थ म्हणजे स्वबळावर उभे राहाणे हे लक्षात ठेवावे. कारण कुबडीवर उभा असलेला नेता मजबूत नसतो; मजबूत असतो तो स्वतःच्या पायावर उभा असलेला. हे राजकारणाचे सत्य आहे आणि महाराष्ट्राने ते आता अधिक जागरूकतेने पाहण्याची गरज आहे.

# आरक्षणाच्या बाबतीत घोळ का? सरकारने कायद्याचा सल्ला का घेतला नाही?

देशातील कोणतीही सरकार असो,सरकार म्हटले की,राज्याची व तेथील जनतेची मोठी जबाबदारी सरकारवर व सत्ताधाऱ्यांवर असते.परंतु राजकीय पोळी शेकण्यासाठी स्वमताने आरक्षण जाहीर करणे किंवा कोणतेही काम करणे हा तर कायद्याने मोठा गुन्हा आहे असे मला वाटते. विरोधक किंवा याचिका करता प्रत्येक सरकारच्या किंवा सत्ताधाऱ्यांच्या चुका काढत असतात आणि काढल्याच पाहिजे कारण हा लोकशाहीचा अधिकार आहे. परंतु आरक्षण जाहीर करतांना सरकारने कायदा, विरोधक, सामाजिक संघटना, बुध्दीजीवी, समाज यांच्याशी सविस्तर चर्चा किंवा विचार-विमर्श का केली नाही? सरकारने कायद्याच्या चौकटीत राहून जर आरक्षण जाहीर केले असते तर सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला आरक्षणाचा सवालच केला नसता.माज्या माहिती नुसार ओबीसी -२७ टक्के आरक्षण,एसी-१३ टक्के आरक्षण, एसटी -७ टक्के आरक्षण आणि एनटी/व्हिजे-३ टक्के आरक्षण अशाप्रकारे एकुण ५० टक्के आरक्षणाची मयार्दा कायद्यानुसार ठरविण्यात आली आहे.परंतु कायद्याचा किंवा सर्वोच्च न्यायालयाशी सल्लामसलत न करता सरकारने आपल्या मर्जीने होवून घातलेल्या निवडणुकीमध्ये आरक्षण जाहीर केले ही तर सरळ-सरळ कायद्याची पायमल्लीच म्हणावी लागेल. राज्यातील ४२ नगरपंचायती आणि २४६ नगरपरिषद निवडणुकीत आरक्षणाच्या घोळामुळे टांगती तलवार आजही कायम असल्याचे दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आरक्षणाने ५० टक्के मयार्दा ओलांडल्याने सुप्रीम कोटार्ने नाराजी व्यक्त केली आहे. सरकारने ८३ पंचायत समित्या,१७ जिल्हापरिषदा,५७ नगरपालिका, आणि २ महानगरपालिका अशाप्रकारे १५९ ठिकाणी ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याची बाब समोर आली आहे.आदिवासीबहुल स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.नंदुरबार जिल्हा परिषदेमध्ये एकूण आरक्षण १०० टक्के, पालघरमध्ये ९३ टक्के, गडचिरोली ७८ टक्के, धुळे ७३ टक्के, नाशिक ७२ टक्के तर अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ, अकोला जिल्हा परिषदांमध्ये ६० ते ७० टक्के दरम्यान आरक्षण लागू झाले आहे.नागपूर, ठाणे, वाशिम, नांदेड, जळगाव, हिंगोली, वर्धा आणि बुलढाणा या आठ जिल्ह्य परिषदांमध्ये ५१ ते ६० टक्के दरम्यान आरक्षण देण्यात आले आहे.या आरक्षणाच्या विरोधात २८ याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत.सरकारने जर आरक्षणाचा घोळ निर्माण केला नसता तर हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात गेलाच नसता.परंतु सरकारने आरक्षणाला व नियमाला काडीमोड केल्याने हा मुद्दा उपस्थित झालेला आहे हे स्पष्ट दिसून येते.निवडणूक आयोग सुध्दा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रतिक्षेत आहे. मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबरला सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालय काय निर्णय घेते याकडे राज्य निवडणूक आयोगासह सर्वांचेच लक्ष लागले आहे.न्यायालयाची पुढील सुनावणी पार पडेपर्यंत निवडणूक आयोगाकडून जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाणार नाही असे चित्र दिसत आहे.सरकारच्या चुकीमुळे निवडणुकांची अनिश्चितता निर्माण झाली आहे.यामुळे राजकीय पक्ष व इच्छुक उमेदवार यांची परिस्थिती तळयात नि मळयात झाल्याची दिसून येते. भारतात लोकशाही आहे त्यामुळे सरकारने कायद्याचा व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान करावा व भविष्यात अशाप्रकारेचे घोळ किंवा चुका निर्माण होणार नाही याची काळजी सरकारने घ्यावी.जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## प्रबोधन

# नेता या देशाचा । प्रत्येकाने व्हावे

थोर तत्त्वचिंतक खलील जिब्रान हा प्रामुख्याने मानवी जीवनाचा भाष्यकार होता, तरीही त्याने समाज आणि राष्ट्र याविषयीसुद्धा मूलभूत स्वरूपाचं तत्त्वचिंतन केलं आहे. दुर्दैवी राष्ट्र कोणतं, यासंबंधी तो म्हणतो, 'ज्या देशात स्वतः विणलेलं वस्त्र वापरीत नाहीत, स्वतःच पिकवलेल्या धान्याची भाकरी खात नाहीत आणि ज्या राष्ट्राचे तुकडे उडालेले आहेत व ज्यातील प्रत्येक तुकडा स्वतःलाच राष्ट्र समजत आहे, ते राष्ट्र अनुकंपनीय होय.' खलील जिब्रानचा हाच विचार विस्तारित केला, तर असंही म्हणता येईल की, ज्या राष्ट्राचे नागरिक अवैध धंद्यात गुंतलेले आहेत, ज्या देशात समांतर प्रशासन व्यवस्था निर्माण झालेली आहे, समांतर न्यायव्यवस्थेचा सावळागोंधळ जेथे असहाय्य, गरीब, दुर्बल, एकाकी व्यक्तींवर अन्यायाची परिसीमा करून त्यांना चिरडून टाकीत आहे, जेथे समांतर अर्थसत्ता मूळ घट्ट धरून फोफावत आहे, ज्या राष्ट्राचे अविचारी सुपुत्र निर्ढावल्या मनाने राष्ट्रघातकी कृत्यं करीत आहेत, त्या आपल्या भारतदेशाची कुणीही कीवच केली पाहिजे.

भारतातील आजच्या स्थितीचं हे वर्णन हृदयविदारक आहे, यात वाद नाही. राजकारण्यांचा बुभुक्षितपणा, नोकरशहांची भ्रष्टाचार लोलुपता, शहाण्यांचा संभावितपणा, अज्ञानी प्रजेची किंकर्तव्य-विमूढता आणि ससेहोलपट, श्रीमंतांचा उन्मत्त चंगीभंगीपणा, आणि कावेबाज धूर्तांचे छक्केपंजे या सर्व मानवी दुर्गुणांनी देशहिताचा कडेलोट होण्याच्या बेतात आहे. ह्याची साक्ष देणारा राज्याचं मंत्रिमंडळ बदल करणारा मुंबईतला 'आदर्श घोटाळा' ताजाच आहे. १९२०ला सुरू झालेलं गांधीयुग पंडित नेहरूंच्या जीवनास्तापर्यंतच अस्तित्वात होतं. पण आज त्याचा मागमूसही सापडणार नाही. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचाराची संधी, असाच अर्थ सर्वांनी घेऊन कायदेभंगाचं आत्मघातकी पर्व सुरू आहे. बेकायदेशीर, अनैतिक कृत्यांची त्सुनामी लाट देशाची प्रचंड वाताहत करीत असताना राजकारणी विचारवंत यशवंतराव चव्हाण काय म्हणतात ते समजून घेणं उद्बोधक ठरेल. ते म्हणाले, 'आम्ही स्वराज्याचा उपयोग किती योजनापूर्वक करतो, यावर या देशाचं भवितव्य अवलंबून आहे, शिकलेल्या प्रत्येकाने अशी प्रतिज्ञा केली पाहिजे की, माज्या देशाला आणि समाजाला जे हवं, ते मी मिळवून देईन.'

पण वरील विचार भारतीय नागरिकांनी कधीच झटकून टाकला आहे. कायद्याच्या राज्याच्या पार्श्वभूमीवर आता काय द्यायचेचं राज्य अवतीर्ण झालं आहे. दारू ही आरोग्याला घातक असेल, पण वाईन मात्र आरोग्यवर्धक असते, असं सर्वोच्च नेते आवर्जून सांगताहेत आणि समाजप्रबोधनाचं व्रत घेतलेली वृत्तपत्रं घरी वाईन कशी करावी, याविषयाची कृती छापून प्रबोधनाच्या मुळावर कुऱ्हाड चालवीत आहेत. राजकारणी व्यक्ती म्हणजे भ्रष्टाचारी व्यक्ती, हे समीकरण जनतेच्या मेंदूत दिवसेंदिवस अधिक घट्ट होत चाललं आहे. अशा दुर्धर प्रसंगी कारभाराची सूत्रं कारभाऱ्यांकडून मालकांनी हातात घेण्याची, अर्थात, सुज्ञ, चौकस, मानवहितदक्ष नागरिकांनी हाती घेण्याची वेळ आली आहे. देशात अनेक अवैध धंदे मोठ्या तेजीत चालू आहेत, ते जागरूक नागरिकांनी बंद पाडायला हवेत. 'देश माझा, मी देशाचा' ही भावना जर प्रत्येकाच्या मनात रुजली, तरच देशाचा विकास शक्य आहे. पण देशप्रेम ज्यांना माहीतच नाही, ते समाजाचे कायमचे नुकसान करणारे उद्योगधंदे सुरू करतात. देशप्रेमींनी अशावेळी जागरूकता दाखवायला हवी. आज रासायनिक दूधनिर्मिती मोठ्या प्रमाणात होत आहे. पाकिस्तानच्या दहशतवादी घुसखोरीपेक्षा आणि चीनच्या अतिक्रमणापेक्षा रासायनिक दूधनिर्मिती महाभयंकर ठरणारी आहे. देशाच्या नव्या पिढीचं, सहा महिन्यांपासून ते पंधरा वर्षांपर्यंतच्या मुलांचं पोषण दुधावर अवलंबून असताना जर रासायनिक विषारी दूध मुलांच्या पोटात जाऊन त्यांची इंद्रियं कायमची विकारग्रस्त झाली, तर भीषण भवितव्याला तोंड देण्याची पाळी येईल. नोकरदार पोलिसांपेक्षा अशा गुन्हेगारांना दक्ष नागरिकच चांगला आळा घालू शकतील. मात्र त्यासाठी आपण स्वदेशनिष्ठ होण्याची गरज आहे. कवी सेनापती बापट म्हणतात, 'देशाचा संसार माझे अंगावरी। ऐसे थोडे तरी वाटू द्या हो। वाटू द्या हो थोडे तरी प्रत्येकासी। माझी कासाविसी याच साठी।'

साहित्यिक ना. ह. आपटे म्हणतात, 'पशूंना द्रव्याची हाव नसते, पण तीच हाव माणसाला पशू बनवते.' द्रव्यलोभाने पशू झालेली कित्येक माणसं मानवहित, समाजहित, कशाचाही विचार न करता दूधभेसळ किंवा रासायनिक दूधनिर्मिती, अन्नभेसळ, तेल-तूप भेसळ, मसालेभेसळ तर करताहेतच; पण त्यापुढे जाऊन ते बनावट औषधं निर्माण करून समाजावर महाअरिष्ट आणताहेत. रक्षकाची भूमिका घेऊन नागरिकांनी साम, दाम, दंड, भेद यांपैकी कशाचाही अवलंब केला, तरच देशाला निरामय आरोग्य लाभेल. मला काय त्याचे असं बेपर्वाईचं वर्तन कोणाही स्वदेशपुत्राला शोभून दिसत नाही. त्यासाठी लक्षात घ्या-

गाव तेथे घाण । येतसे दिसून।
व्हा रे सावधान । त्याचसाठी ॥१
गाव स्वच्छ ठेवा। देश स्वच्छ ठेवा
घाण दूर ठेवा। अहर्निश ॥ २
दुर्जन ही घाण। दिसता धावून
टाका गावातून काढून ती ॥ ३
दुर्जनाचा लोभ । करी सर्वनाश
देशहिता फास । जीवघेणा ॥४
दुर्जन अवैध धंद्यात गुंततो
समाजाला नेतो। रसातळा ॥५
देशाची, लोकांची। चिंता नसे त्यास
समाजाचा नाश करी तोच ॥६
सज्जनांनी दक्ष राहावे हमेशा
वाचवावे देशा। सर्वकाळ ॥७
नेता या देशाचा । प्रत्येकाने व्हावे
उधाण आणावे। देशहिता ॥ ८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# सोमनाथ आवताडे यांची प्रभाग 3 मधून बिनविरोध निवड

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** मंगळवेढा नगरपालिकेच्या निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले असताना आमदार समाधान आवताडे यांचे बंधू सोमनाथ आवताडे यांच्या विरोधात प्रभाग ३ मधूनरिंगणात असलेल्या उमेदवारांनी माघार घेतल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. यासोबतच भाजपने मंगळवेढ्यात आपले खाते उघडले आहे. प्रभाग क्रमांक 3 मधून सोमनाथ आवताडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या विरोधात 2 उमेदवारांनी अर्ज भरला होता. परंतु आज विरोधातील सर्वांनी निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे सोमनाथ आवताडे हे बिनविरोध निवडून आले आहेत.या निवडीनंतर मंगळवेढा नगरपालिकेत भाजपचे खाते उघडले आहे. मंगळवेढा ही ‘क’ दर्जाचे नगरपालिका असून



याठिकाणी 10 प्रभाग आहेत. 20 जागांसाठी ही निवडणूक होणार आहे.महाराष्ट्रात सर्वात लहान नगरपालिका म्हणून या नगरपालिकेची ओळख आहे. सोमनाथ आवताडे यांच्या विरोधातील सर्व अर्ज मागे घेण्यात आले आहेत. त्यामुळे सोमनाथ आवताडे हे बिनविरोध निवडले गेले आहेत.मंगळवेढा नगरपालिकेतील निवडणूक यंदा विशेष चर्चेत होती, कारण सोमनाथ आवताडे पहिल्यांदाच नगरपालिका निवडणूक लढवत होते. मात्र, प्रतिस्पर्धी उमेदवारांनी अचानक माघार घेतल्याने त्यांचा विजय सहज झाल्याचे दिसून आले. आज आमदार समाधान आवताडे यांचा वाढदिवस होता. त्या वाढदिवसानिमित्त त्यांनी त्यांचे बनतो सोमनाथ अवताडे यांना मंगळवेढा नगरपालिकेचे सदस्य म्हणून बिनविरोध निवडून आणले. त्यामुळे आमदारा अवताडे यांच्याकडून आपले बंधू सोमनाथ अवताडे यांना वाढदिवसानिमित्त नगरसेवक पदाचीभेट दिली असे म्हणावे लागेल.आमदार समाधान आवताडे यांचे बंधू सोमनाथ अवताडे यांची मंगळया नगरपालिकेवर नगरसेवक म्हणून बिनविरोध निवड झाल्याबद्दल भोसे,रड्डे ,नंदेश्वर, आदी परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# अवैध वाळू वाहतुकीवर महसूल प्रशासनाची कारवाई



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** महसूल विभागाच्या भरारी पथकाव्दारे पंढरपूर शहरालगत असणाऱ्या चिंचोली भोसे इसबावी येथील भीमा नदीपात्रात वाळू चोरीसाठी वापरण्यात येणाऱ्या आठ लाकडी होड्या कटरच्या साह्याने कापून नष्ट करण्यात आल्या आहेत. सदर कारवाई आज दिनांक 20 नोव्हेंबर 2025 रोजी करण्यात आली असून, ही कारवाई प्रांताधिकारी सचिन इथापे व तहसीलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी पंढरपूर विजय शिवशरण, पंढरपूर मंडळातील ग्राम महसूल अधिकारी, अमर पाटील, प्रमोद खंडागळे, महेश कुमार सावंत, संजय खंडागळे, गणेश पिसे यांनी केली आहे.

# ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुनाच्या आशीवार्दाने नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** आगामी अक्कलकोट नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन आणि श्री स्वामी समर्थ महाराज समाधी मठ येथे नारळ फोडून मोठ्या जल्लोषात करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षपदाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी, सौ. सुनंदा श्रीशैल स्वामी, भिमराव आत्माराम शेळके, सौ. कस्तुरा चौगुले, लक्ष्मीकांत धनशेट्टी, मुस्तफा गवंडी, रेश्माताई शेख, अविनाश मडीखांबे, मंजनाताई कामनुरकर, रेणुकाताई राठोड,



रमेश पंचप्पा कापसे, अपणार्ताई सिद्धे, यशवंत धोंगडे, नावेद डांगे, अमृताताई शिंदे, शैलाताई स्वामी, महेश हिंडोळे, स्नेहाताई खवळे, सद्दामहुसेन शेरीकर, सोनालीताई शिंदे, देविदास कविटगी, आरतीताई गायकवाड, महेश इंगळे, ऋतुराज राठोड, भागुबाई कुंभार, अल्फिया कोरबू, प्रदीप पाटील, मोतीराम राठोड, शिवशरण जोजन, अप्पू बिराजदार, अमोलराजे भोसले, दिलीप सिद्धे, किशोर सिद्धे, अप्पासाहेब पाटील, शिवराज स्वामी, उत्तम गायकवाड, अंकुश चौगुले, बबलू कामनूरकर, विक्रम शिंदे, दयानंद बिडवे, दयानंद रोडगे, शैलेश राठोड, नागराज कुंभार, नन्नू कोरबू यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक पात्रता (MAHA TET) परीक्षा केंद्राच्या 100 मिटर परिसरात बंदी आदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र लोकसेवा आयोग, यांचेमार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता (MAHATET) परीक्षा 2025 ही दि.23 नोव्हेंबर 2025 रोजी 10.00 वा. ते 05.00 वा. या वेळेत सोलापूर शहरातील खाली नमुद 34 परीक्षा उपकेंद्रांवर होणार आहे.

सदर परीक्षा कालावधीत सर्व परीक्षा केंद्राच्या परिसरात झेरॉक्स सेंटर, फैक्स, ईमेल, रेडिओ, इंटरनेट अशा दळणवळण सुविधा यांचा परीक्षेच्या अनुषंगाने गैरवापर होण्याची शक्यता आहे, अशा सुविधा कार्यरत ठेवणे, वायरलेस सेंट, ट्रांझिटर, मोबाईल फोन, टॅबलेट, इलेक्ट्रॉनिक घड्याळ, संगणक गणनायत्र (कॅल्क्युलेटर), ई-मेल, इंटरनेट, झेरॉक्स सेंटर यासारख्या दळणवळण साधनांचा परीक्षा केंद्राच्या आवारात उपयोग केला जातो. तसेच परीक्षा प्रक्रियेशी संबंधीत नसलेली व्यक्ती परीक्षा केंद्राच्या आवारात प्रवेश करणे, तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात बाह्य उपद्रव कमी करणे, परीक्षार्थींना कोणताही अडथळा होऊ नये आणि परीक्षा प्रक्रियेशी संबधित शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना त्यांचे परीक्षेशी संबंधित कर्तव्ये चोखपणे, कोणताही अडथळा अथवा उपद्रव न होता बजावता यावे म्हणून परीक्षा केंद्राच्या सभोवताली 100 मीटर परीसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 163 चा आदेश लागू करणे निकडीचे असल्याने. पोलीस उप आयुक्त, (गुन्हे/विशा), सोलापूर शहर डॉ. अश्विनी पाटील, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 163 अन्वये यांनी असा आदेश दिला आहे की, दिनांक 23 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी 07.30 वा. ते सायंकाळी 06.00 वा. पर्यंत पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर हदीचे कार्यक्षेत्रातील खाली नमुद सर्व परीक्षा केंद्रावर परीक्षा केंद्रापासून 100 मीटर परिसरात खालील कृती करण्यास बंदी घालत आहे.

परीक्षा केंद्राच्या परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे. परीक्षा केंद्राच्या परिसरात सार्वजनिक शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करणे. परीक्षा केंद्राचे 100 मीटर परिसरातील झेरॉक्स, फैक्स सेंटर, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ, ध्वनीक्षेपक, संगणक केंद्र, इंटरनेट कैफे अशा दळणवळण सुविधा आणि पानपट्टी कार्यरत ठेवणे, परीक्षा केंद्राचे परिसरात मोबाईल फोन, टॅबलेट, इलेक्ट्रॉनिक घड्याळ, सेल्युलर फोन, वायरलेस सेट, ट्रान्झीटर व इतर माध्यमासह प्रवेश करणे. परीक्षा केंद्राचे 100 मीटर परिसरात कोणत्याही वाहनांस प्रवेश करणे.

परीक्षा प्रक्रियेशी संबंधित नसलेली व्यक्ती (उमेदवारांचे नातेवाईकासह) परीक्षा केंद्राचे 100 मीटर परिसरात प्रवेश करणे. परीक्षा केंद्राचे 100 मीटर परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येणे.

या आदेशाचा कोणी कोणत्याही प्रकारे भंग केल्यास ती व्यक्ती भारतीय न्याय संहित 2023 चे कलम 223 प्रमाणे शिक्षेस पात्र होईल. असे आदेश पोलीस उप आयुक्त,(गुन्हे/विशा) शहर डॉ. अश्विनी पाटील यांनी दिले आहेत.

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई :** महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय मुंबई शहर/ उपनगर मार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महामंडळाच्या विविध योजनांकरिता कर्ज प्रस्ताव महादिशा पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन महामंडळाचे मुंबई शहर व उपनगर जिल्ह्याचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

अनुसूचित जाती आणि नवबौद्ध बांधवांच्या स्वयंरोजगार, आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक उन्नतीसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री अनुसूचित जाती अभ्युदय योजना (पीएम-एजेएवाय) अंतर्गत ही अर्ज प्रक्रिया राबविण्यात येत आहे. रोजगाराच्या संधी निर्माण करून जीवनमान उंचावणे हा या योजनांचा मुख्य उद्देश असल्याचे महामंडळाने स्पष्ट केले आहे. अजार्ची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात होणार असून इच्छुक लाभार्थ्यांनी आपले अर्ज https://mpbcdc.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर करावेत. अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे. प्रत्यक्ष कार्यालयात कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

अर्ज करण्यास आवश्यक पात्रता अर्जदार अनुसूचित जाती व नवबौद्ध संवर्गातील असावा व त्याचे वय १८ ते ५० वर्षे असावे. वार्षिक उत्पन्न मयार्दा ग्रामीण व शहरी तीन लाख रुपये आहे. अर्जदार हा या महामंडळाच्या योजनांचा व इतर वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा. अर्ज करण्यास आवश्यक कागदपत्रे जातीचा व उत्पन्नाचा सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या दाखला. पाच पासपोर्ट आकाराचे फोटो, रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, आधारकार्ड, पॅन कार्ड ची प्रत. कोटेशन व व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या जागेचा पुरावा, व्यवसायानुसार इतर दाखले, आवश्यकतेप्रमाणे प्रकल्प अहवाल, बँक खाते क्रमांक, पासबुकची झेरॉक्स प्रत आवश्यक आहे.

अनुदान योजना, बीज भांडवल योजना, थेट कर्ज योजना, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ योजना, राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाच्या योजना, एनएसएफडीसी व एनएसकेएफडीसी शैक्षणिक कर्ज योजना या सर्व योजनांची सविस्तर माहिती, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची यादी व पात्रतेच्या अटी महामंडळाच्या महादिशा पोर्टलवर उपलब्ध आहेत. तरी सर्व इच्छुक लाभार्थ्यांनी अर्ज करण्यापूर्वी माहिती वाचून घेणे आवश्यक आहे. जास्तीत इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करावेत असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## वात्रटिका

### थंडीतील गरमाई

कडाक्याच्या थंडीत
वातावरण तापू लागले...
तलवार झाली जीभ आणि
जीभेनेच गळे कापू लागले...
अजून पुढे काही काही
ऐकायचे,पाहायचे आहे...
राजकीय रंग चढला की
नवे राजकारण दिसायचे आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचा ९ वा युनिफॉर्म 2025 फेअर मुंबई मध्ये



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आठ युनिफॉर्म गारमेंट फेअर यशस्वीरित्या राबविल्यानंतर आता पुन्हा सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशन च्या नवव्या फेअरचे आयोजन मुंबई गोरेगाव एक्झिबिशन सेंटर येथे केले असून याचे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सोलापूरचे आमदार नामदार सुभाष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार असल्याचे फेअर चेअरमन अजय रंगरेज यांनी सांगितले.

हे युनिफॉर्म गारमेंट फेअर 26,27,28 नोव्हेंबर 2025 ला मुंबई गोरेगाव एक्झिबिशन सेंटर येथे संपन्न होणार आहे अशी घोषणा केलेली असल्याचे फेअर सचिव श्रीकांत अंबुरे यांनी सांगितले.

या फेअर च्या माध्यमातून युनिफॉर्म सोर्सिंग प्लॅटफॉर्म फक्त सोलापूरच आहे किंवा असा वैश्विक संदेश देत असताना सोलापुरात फक्त युनिफॉर्म गारमेंट यशस्वीरित्या बनवू शकतो असा उद्देश आहे. ही माहिती यशस्वीरित्या सर्व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यांना पोहोचवण्याचा प्रयत्न केलेला आहे. या युनिफॉर्म फेअर मध्ये युनिफॉर्म चे एकूण बाराशे ब्रँड व दहा हजार डिझाइन्स एकाच छता खाली पाहायला मिळतील. याचा अर्थ शाळा, कॉलेज, हॉस्पिटल्स, रेल्वे आणि कार्पोरेट सेक्टर ना ही एक युनिफॉर्म ची मेजवानीच ठरेल असे आम्हास वाटते.

सोलापूर जिल्ह्यात सक्षम आणि यशस्वीरित्या युनिफॉर्म गारमेंट कारखाने चालविणारे उद्योजक आहेत. विशेष आणि दर्जेदार मशिनरी द्वारा व कुशल कारागीर द्वारा या सर्व प्रकारच्या युनिफॉर्म गारमेंट चे उत्पादन होते.

देशातीलच नव्हे तर जगातील एकमेव युनिफॉर्म सोर्सिंग हब बनण्याच्या उद्देशाने सोलापूर आपले लक्ष निर्धारित करीत असल्याचे सुनील मेंगजी यांनी सांगितले आहे कारण उत्कृष्ट डिझाइन्स चांगले दर्जेदार कापड व कुशल कामगारांच्या हस्ते ही युनिफॉर्म बनविले जाते आणि ती कमीत कमी खर्चात उपलब्ध करून दिली जाते त्यामुळे सर्व जगाचे लक्ष युनिफॉर्म गारमेंट करिता सोलापूरकडे लागले असल्याचे त्यांनी सांगितले.

26,27,28 नोव्हेंबर 2025 या तीन दिवसात गोरेगाव मुंबई येथील एक्जीबिशन सेंटर मध्ये संपन्न होणाऱ्या प्रदर्शनास मुंबई शहर व परिसरातील शैक्षणिक संस्था, व्यापारी, आणि कार्पोरेट क्षेत्रातील उद्योजकानी आवर्जून उपस्थित राहून या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशन तर्फे करण्यात आले आहे.

राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर या युनिफॉर्म प्रदर्शनाचे नाव झालेले आहे कारण इकडे कमीत कमी दरात दर्जेदार कापड घेऊन युनिफॉर्म बनविले जाते जास्त करून स्कूल युनिफॉर्म, कॉलेज युनिफॉर्म, हॉस्पिटल युनिफॉर्म, कार्पोरेट युनिफॉर्म, रेल्वे युनिफॉर्म, असे विविध नामवंत संस्थांची कामे या प्रदर्शनाच्या माध्यमातून सोलापूरचे उद्योजक केलेले आहेत.

आता पर्यंत संपन्न झालेल्या प्रदर्शनाला केनिया, जॉर्डन श्रीलंका थायलंड अशा विविध देशातील उद्योजकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन युनिफॉर्म चे काम करून घेतलेले आहेत. अशा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रदर्शनास भेट देण्यासाठी बेंगलोर करांनी आवश्यक यावे असे आवाहन सोलापूर गारमेंट गारमेंट मॅन्युफॅक्चर असोशियनच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# बिनविरोध नगरपंचायतीसाठी माजी आ. राजन पाटील यांचा सत्कार



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-**मोहोळ तालुक्यातील अनगर नगरपंचायतच्या प्रथम नगराध्यक्षा प्राजक्ताताई अजिंक्यराणा पाटील यांच्यासह १७ नगरसेवकांची बिनविरोध निवड केवळ औपचारिकता उरली आहे. या विजयाबद्दल माजी आ. राजन पाटील यांचे माजी आ. यशवंत माने यांनी सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी लोकनेते शुगरचे अध्यक्ष बाळराजे पाटील, अजिंक्यराणा पाटील, युवा उद्योजक श्रीकांत माने, प्रकाश चवरे, दीपक माळी, संतोष वाबळे, धनंजय रणवरे यांच्यासह मान्यवर, कार्यकर्ते उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग, सोलापूर, कुमठा नाका, उजनी वसाहत, सोलापूर- ४१३ ००३.**

ई-मेल :-eemdsolapur@gmail.com दूरध्वनी क्र. (०२१७) २९९०७१४

**निविदा सूचना क्रमांक ०८ सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहे. सविस्तर निविदा सूचना शासनाच्या http://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करून देण्यात येईल.

कामाचे नांव :- विभागीय कार्यालयीन कामाकरिता एक वर्षाकरिता डेटा एन्ट्री ऑपरेटर पुरवठा करणे काम.

जिल्हा :- सोलापूर

निविदेची किंमत रुपये :- रु.२५८०६३/-

निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक -२६/११/२०२५ (सकाळी ११ पासून) ते दिनांक- ०४/१२/२०२५ (दुपारी २.०० वाजता पर्यंत)

निविदा स्वीकृती व उघडण्याचा दिनांक :- दिनांक- ०८/१२/२०२५ (दुपारी ४.०० वाजता)

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१२१७/प्र.क्र.११४/१७)/यांत्रिकी दिनांक ०५/०७/२०१८ आणि शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण ०५२३/(प्र.क्र.२५/२०२३)/यांत्रिकी दिनांक १४/१०/२०२४. शासन निर्णय निविदा ४१७ / प्र.क्र.२४७/१७ दि. १८/१०/२०२३ अन्वये करारनाम्यात अनुक्रमे पश्चात अर्हता निकष व इतर सर्व अटी लागू राहतील.

खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

http://mahatenders.gov.in (सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास सदर वेबसाईटवर कळविण्यात येईल.). निविदा सादर करणारे कंत्राटदार जलसंपदा विभागातील यात्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही.

जावक क्र./यां.वि.सोलापूर./लेखा-२/निविदा/१९१५/
सन २०२५.
कार्यकारी अभियंता,यांत्रिकी विभाग,सोलापूर यांचे कार्यालय
दिनांकः - १९/११/२०२५.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग, सोलापूर**

जिमाका/सो/जाहि/२०४/२०२५-२६

# नातेपुते येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे उत्साहात शुभारंभ



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती श्री संत ज्ञानेश्वर महाराज ७५० वा जन्मोत्सव भक्त शिरोमणी श्री संत नामदेव महाराज ६७५ वा संजीवनी समाधी सोहळा निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. ह भ प गुरुवर्य मनोहर महाराज भगत यांच्या प्रेरणेतून नातेपुते येथील श्री विठ्ठल मंदिरात श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणास दि. २१ नोव्हेंबर रोजी सकाळी सुरुवात झाली. यावेळी कलश पूजन प्रतिमा पूजन, भगवान पांडुरंग प्रभू श्रीराम, ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम महाराज, ध्वज, दीप प्रज्वलन, ग्रंथ पूजन, हा सर्व पूजन सोहळा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला यावेळी कलश पूजन नातेपुते नगरीच्या नगराध्यक्षा अनिता लांडगे व नंदकुमार लांडगे यांच्या शुभहस्ते तसेच माजी उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख,हनुमंत धालपे, विजयकुमार उराडे, प्रवीण काळे, राजेंद्र पांढरे, दत्तात्रय भाऊ उराडे, डॉ, विठ्ठल कवितके, अ‍ॅड. सुभाष लोणारी, डॉ. नरेंद्र कवितके, अ‍ॅड. धनंजय भांड,अक्षय भांड, सागर बिचुकले, दस्तगीर मुलाणी, समाधान माळी, संजय मामा उराडे, अनिल काळे, केशव पांढरे, किरण टकले यांच्या हस्ते पूजन सोहळा संपन्न झाला, यावेळी नातेपुते परिसरातील भजनी मंडळ व महाराज मंडळी तसेच अखंड हरिनाम सप्ताह समिती अध्यक्ष गणेश पागे, विनायकराव उराडे,गणेश कुचेकर, मंगेश दीक्षित, अमोल पाडसे, उमेश पोददार, अभिजीत म्हामणे, जालिंदर ढोंबरे, जयवर्धन चिंचकर, भगत महाराज सह भाविक भक्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स. म. कारखान्यामध्ये 1 लाख 51 हजार 151 व्या साखर पोत्याचे पूजन संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या सन 2025-2026 चा 64 व्या गळीत हंगामामध्ये उत्पादित झालेल्या 1 लाख 51 हजार 151 व्या साखर पोत्याचे पूजन कारखान्याच्या संचालिका कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे कुशल मार्गदर्शनाखाली व चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखान्याची प्रगतीपथावर वाटचाल चालू आहे.

कारखान्याचा गळीत हंगाम 2025-2026 हा अखंडितपणे पुर्ण क्षमतेने सुरू असून, आज अखेर 1 लाख 85 हजार 064 मे.टन ऊसाचे गाळप होऊन 1 लाख 51 हजार 151 क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन झाले आहे. सध्या प्रतिदिन सरासरी ८,500 मे.टन प्रमाणे ऊसाचे गाळप चालू आहे.

या सिझनमध्ये को-जन वीज निर्मिती प्रकल्प दि.२५ ऑक्टोबर २०२५ रोजी सुरू झाला असून दि. 20 नोव्हेंबर 2025 रोजी अखेर 1 कोटी 47 लाख 45 हजार 960 युनिट वीज निर्माण झाली असून त्यामधून 89 लाख 94 हजार 200 युनिट वीज विक्री केलेली आहे. तसेच उपपदार्थ प्रकल्प डिस्टिलरी मध्ये दि. 20 नोव्हेंबर 2025 अखेर 22 लाख 85 हजार 748 लिटर्स रेक्टिफाईड स्पिरिट तसेच 19 लाख 30 हजार 6 लिटर्स इथेनॉल उत्पादन झाले असल्याची माहिती कारखान्याचे सेक्रेटरी अनिल काटे यांनी दिली.

सदर प्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख तसेच संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, अ‍ॅड.विजयकुमार पवार, रावसाहेब मगर, संग्रामसिंह जहागिरदार, रामचंद्र सिद, विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, महादेव क्षिरसागर, भिमराव काळे, गोविंद पवार, डॉ. सुभाष कटके, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक अ‍ॅड.प्रकाशराव पाटील रामचंद्रराव सावंत-पाटील संचालिका सौ.सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक रणजीत रणनवरे माजी संचालक भिमराव काळे, महादेवराव घाडगे, रामचंद्र चव्हाण, सुनिल एकतपुरे, महादेवराव चव्हाण, चांगदेव घोगरे, राजेंद्र मोहिते, महाळूंग नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष भिमराव रेडे, शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडिया लेजर शो कमिटी संचालक बाळासाहेब माने-देशमुख, दत्तात्रय चव्हाण, राजेंद्र भोसले, धनंजय सावंत, नामदेव चव्हाण, धनंजय दुपडे, अनिलराव कोकाटे, श्रीकांत बोडके, सौ.हर्षाली निंबाळकर तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सदर साखर पोती पूजन प्रसंगी कारखान्याच्या संचालिका कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांचे स्वागत चिफ केमिस्ट एस.एन.जाधव व सत्कार चिफ इंजिनियर एस. के. गोडसे यांनी केला.

# सहकार महर्षि कारखान्यामध्ये वाहतूक सुरक्षा नियम मार्गदर्शन शिबिर



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शंकरनगर-अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम २०२५-२६ सुरू असून याबाबत वाहन व वाहन चालक यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने अकलूज पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक निरज उबाळे व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे यांचे प्रतिनिधी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शितल शिंदे यांनी कारखाना कार्य स्थळावरती उपस्थित सर्व ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनाचे चालक यांना वाहतूक करत असताना घ्यावयाची दक्षता व काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

त्यांनी ऊस वाहतूक करत असताना होणारे अपघात व याबाबत वाहन चालकांनी घ्यावयाची दक्षता यामध्ये वाहनाचा वेग रिफ्लेक्टरचा वापर,योग्य दिशेने वाहन चालवणे, वाहनाच्या टेप रेकॉर्डरचा आवाज नियंत्रित ठेवणे,एका ट्रॅक्टरच्या पाठीमागे दोनपेक्षा जादा ट्रॉली न जोडणे,वाहन चालविताना मद्यपान, मोबाईलचा वापर न करणे, क्षमतेपेक्षा जादा ऊस वाहतूक न करणे,विना पासिंग वाहन ऊस वाहतुकीकरता न वापरणे इत्यादी अनुषंगिक बाबत सूचना व मार्गदर्शन केले तसेच आपल्या व इतरांच्या कुटुंबाप्रती असणारी जबाबदारीची जाणीव व भावना निर्माण केली.या सूचना व मार्गदर्शनामुळे कोणताही अपघात होऊन जीवित हानी होऊ नये तसेच गुन्हे दाखल होऊ नयेत अथवा इतर व आपल्या वाहनाचे नुकसान होऊ नये याची काळजी घेतल्याने होणारा मोठा अनर्थ टळणार आहे.

सदर कार्यक्रम प्रसंगी कारखान्याचे शेती अधिकारी समाधान चव्हाण यांनी उपस्थित पोलीस व परिवहन विभागाचे अधिकारी यांचे स्वागत केले. त्यावेळी त्यांनी कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे कुशल मार्गदर्शनाखाली व कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखाना प्रगती पथावर वाटचाल सुरू आहे.त्यांच्या शिस्तबद्ध परंपरेनुसार कारखान्याचे अपघात मुक्त व नाव लौकिकास पात्र असे कामकाज सुरू आहे असे सांगितले. सहकार महर्षी कारखान्याच्या ऊस वाहतुकीमुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास होऊ नये अथवा अपघात घडू नये याकरिता कारखान्याच्या संचालिका कु. स्वरुपाराणी जयसिंह मोहिते- पाटील यांच्या कल्पनेतून वाहनचालक यांच्यामध्ये सुरक्षेतेची जागृती व्हावी या उद्देशाने या शिबिराचे आज कारखाना कार्यस्थळावर आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रम प्रसंगी सहकार महर्षी कारखान्याचे ऊस तोडणी वाहतूक कॉन्ट्रॅक्टर, मुकादम,वाहन चालक-मालक,शेती विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.हे शिबिर संपन्न झाल्याने वाहन चालकात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अ‍ॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

**जाहिर प्रसिध्दीकरण** क्र.२०२५/कुका(जन्म नोंद) एसआर/४७३/२०२५ SR-15

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा यांचे न्यायालयात**

भारत गुंडीबा लोंखडे,रा. आहेरगाव ता.माढा. जि. सोलापुर } अर्जदार
विरूध्द
ग्रामसेवक, ग्रामपंचायत आहेरगाव ता. माढा जि. सोलापूर } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार याने त्यांचे नात धनश्री अरुण लोखंडे यांचा जन्म दिनांक २०/०५/२०१० रोजी आहेरगाव ता. माढा येथे झालेला आहे. परंतु त्याचा जन्माची नोंद पुर्वीचे ग्रामपंचायत/न.पा. आहेरगाव येथे केलेली नसलेने अर्जदार यांनी ग्रामपंचायत / न.पा आहेरगाव येथील रजिस्टरला नोंदवून तसा दाखल मिळणेकमी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, अर्जदार यांना त्याचे नात धनश्री अरुण लोखंडे यांचा जन्म दिनांक २०/०५/२०१० यांचे जन्म घटणेची नोंद धरणे कामी व दाखला देणेकामी कुणाची काही लेखी अथवा तोंडी तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही हितसंबंध असल्यास सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण झालेल्या दिवसापासून पंधरा (१५ दिवस) आत लेखी अथवा तोंडी तक्रार माझे समक्ष तहसिल कार्यालय माढा येथे मांडावी. सदर मुदतीत कुठलीही हरकत/तक्रार प्राप्त न झालेस त्यानंतर वरील अर्जदार यांना वरीलप्रमाणे मागणीप्रमाणे जन्म नोंद धरुन तसा दाखला देण्याबाबत योग्य ते आदेश करण्यात येईल तदनंतर कोणाची काहीएक तक्रार चालणार नाही यांनी नोंद घ्यावी. ही नोटीस आज माझी सही व शिक्यानिशी दिली.

(शिक्का) सही/-तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) दबंग चित्रपटातील एक अभिनेता, सलमानचा भाऊ २) नॅपकिन (मराठीत) ३) तुरूंग (इंग्रजीत) ४) दूध मोजण्याचे प्रमाण ५) अफगाणिस्तानची राजधानी ६) मला ७) रसदार १०) खडबडीत (इंग्रजीत) १२) नशीब (इंग्रजीत) १४) घरातील कपडे व महत्त्वाच्या वस्तू ठेवण्याची मोठी उभी पेटी १५) कापड फाटताना होणारा आवाज १६) भांड्याना कलई करताना वापरतात तो पांढरा खनिज पदार्थ २०) धावपट्टू (इंग्रजीत) २२) ब्रेड (मराठीत) २३) मुलगा (हिंदीत) २६) मेडल (मराठीत) २७) संस्थेचा सदस्य २८) वर्षाच्या सुरूवातीचा महिना ३०) नऊ+आठ ३२) कागदाचा चतुर्थांश भाग, कॉलम ३४) एक अभिनेत्री-*** टंडन ३६) वस्त्र ३७) चौदा दुणे ४०) दृष्टी ४१) अरण्य, एक (इंग्रजीत) ४२) कष्ट करण्याने दमणे ४३) सांडपाणी वाहणारा नाला ४५) पाणी ४८) शाहिराचे वाद्य ४९) निवडणुकीत उमेदवाराला व्होट देणे-**दान

**आडवे शब्द :** १) भारताचे दिवंगत झालेले केंद्रीय अर्थमंत्री ५) कष्ट करणारा श्रमिक ८) श्री लक्ष्मीदेवीचे एक नाव ९) कलिंगडाप्रमाणे एक फळ ११) मनातील खंत १३) लहान मूल १५) बी च्या वरील आवरण, फोलकट १६) स्वर्गच्या विरूध्दार्थी १७) दोन लाकडी वस्तू जोडण्यासाठी त्यामध्ये बसविलेला निमुळता लाकडी तुकडा १८) आईची बहीण १९) मीठाची चव २१) पत्र २४) पाच+दोन २५) ख्रिश्चन धर्मसेविका २६) वाईट अवस्था, दुर्दशा २७) गस उलट लिहा २९) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा ३१) कामकाज ३३) नशीब (हिंदीत) ३५) सातारा जिल्ह्यातील फुलांसाठी प्रसिध्द असलेले पठार ३६) छ. शिवरायांची लढाई पध्दत-गनिमी ** ३७) नऊ दुणे ३८) छंद, आवड ३९) कथेतील पंख असणारी स्त्री ४०) नऊ नाथ देव ४३) किल्ला ४४) वळीव पावसावेळी आकाशात कडाडणारी ४६) लोक ४७) चवीला कडू ५०) कुत्र्याचा जोडीदार ५१) पाण्याचे बाष्परूप ५२) चांदी

## सुडोकु - 107

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 1 | | 5 | | 6 | 8 | |
| | | | 6 | 8 | 7 | | | 5 |
| 8 | | | | 1 | 3 | | 2 | |
| 4 | | | | | 2 | | | |
| | | 2 | | | 8 | 7 | 6 | |
| | 8 | 6 | 4 | | | 1 | | |
| 3 | | 4 | 8 | | | 2 | 5 | |
| 1 | 5 | 8 | | | | 3 | 4 | |
| | 2 | 9 | | | 5 | | 7 | 1 |

# अकलूज नगरपरिषद निवडणुक

## नगराध्यक्ष पदासाठी पंचरंगी लढत तर नगरसेवक पदासाठी ९१ उमेदवार रिंगणात



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज नगरपरिषदेच्या पहिल्याच पंचवार्षिक निवडणुकीत आज नगरसेवक पदासाठी एकूण १०१ अर्ज वैध झाले होते तर नगराध्यक्ष पदासाठी ६ अर्ज वैध ठरले होते.आज उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस होते.त्यामध्ये नगराध्यक्ष पदासाठीच्या निवडणुकीत एका उमेदवाराने माघारी घेतल्यामुळे नगराध्यक्ष पदाची पंचरंगी लढत अकलूजकरांना पहायला मिळणार आहे.तर नगरसेवक पदासाठी १०१ उमेदवारांचे अर्ज वैध झाले होते.आज १० जणांनी आपला उमेदवारी अर्ज माघारी घेतल्यामुळे ९१ उमेदवारात लढत होणार आहे. अकलूज ग्रामपंचायतीचे रूपांतर अकलूज नगरपरिषदेत होवून तीन- चार वर्ष होवून गेली. अनेक दिवसांच्या प्रतिक्षेनंतर अकलूजच्या नागरिकांना पहिल्यांदाच नगरपरिषदेची निवडणूक पहायला मिळणार आहे.त्यामुळे उमेदवारांबरोबर मतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आज अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस होता. शेवटच्या दिवशी नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीतून उमा गायकवाड यांनी आपला उमेदवारी अर्ज माघारी घेतल्यामुळे आता पाच उमेदवारात लढत होणार आहे.तर नगरसेवक पदासाठी एकूण १०१ अर्ज वैध झाले होते.त्यामधील अनिता चव्हाण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), रणजीत भोसले (शरदचंद्र पवार), दिपाली कसबे (अपक्ष), आशुतोष साठे (म.वि.से.) पक्ष, कासीम तांबोळी (काँग्रेस पक्ष), अजित तोरसकर (अपक्ष), दत्तात्रय कांबळे (म.वि.से.), अजित भागवत (अपक्ष), स्वरूप शिंदे (अपक्ष), सुवर्णा गाजरे (अपक्ष) यांनी आज उमेदवारी अर्ज माघारी घेतले आहेत.त्यामुळे आता अकलूज नगरपरिषदेची निवडणूकीत ९१ उमेदवारात आहे.तर नगराध्यक्ष पदाच्या निवडणुक पाच उमेदवारात लढत आहे.

# प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर या कार्यालयात लवकरच दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणावर इच्छुकांचो गर्दी होते व त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो व ब-याच वेळा नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने तो मिळावा, यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरुन हवे असतील त्यांनी दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी सोबतच्या वेळापत्रकानुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या दरम्यान विहीत नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी (केवळ क्र १६ अन्वये जारी झालेले डी डी), पत्त्याचा पुरावा, आधार लिंक मोबाईल नंबर, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वतः जमा करावा.

सदर डीडी फक्त" Dy R.T.O. Solapur " यांच्या नावे नॅशनलाईज शेडयुल्ड बँकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील.

अजासीबत केंद्रिय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ४ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५ अ मध्ये विहीत केलेल्या पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल (उदा. आधार कार्ड, टेलिफोन बील इ.) एकाच नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता कार्यालयीन नोटीसबोर्डवर लावण्यात येईल. या यादीतील अर्जदारांना लिलावाकरिता जर जास्त रक्कमेचा डीडी जमा करावयाचा असेल त्यांनी सोबतच्या वेळापत्रकानुसार दर्शविलेल्या दिवशी (दि. २९ नोव्हेबर २०२५ रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत) सीलबंद लिफाफ्यात कार्यालयात जमा करावा. लिलावासाठी सादर केलेला डीडी रुपये ३००/- पेक्षा कमी रकमेचा नसावा. सदर डीडी फक्त "Dy R.T.O. Solapur "यांच्या नावे नॅशनलाईज शेडयुल्ड बँकेंचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील डीडी कमीत कमी एक महिना मुदतीमध्ये असावा. दिनांक २१नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांच्या उपस्थितीत पात्र व्यक्तीसमोर (संबंधित अर्जदार) लिफाफे उघडुन ज्या अर्जदाराने विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्यास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाईल.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर करून वाहन क्रमांक प्राप्त करून घ्यावा अन्यथा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल, कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही अथवा त्याचे समायोजन करता येणार नाही, वाहन धारकाने एका वाहनासाठी एकापेक्षा जास्त आकर्षक नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी कार्यालयात डी.डी. जमा केल्यास सदर बावीस कार्यालय जबाबदार राहणार नाही.

दुचाकी वाहनांच्या मालिकेचे वेळापत्रक (MH 13 EZ ) दिनांक दि.२० नोव्हेंबर २०२५, तिप्पट शुल्कचे अर्ज व परिवहन संवर्ग वाहनांसाठी नियमित अर्ज स्विकारणे, वेळ - ११ ते ४. दि. २०/११/२०२५ सायंकाळी ०५.०० वाजता यादी जाहीर. दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ०२ वाजेपर्यत बंद लिफाफ्यात लिलावासाठीचे डीडी स्विकारणे रुपये ३००/- पेक्षा जास्त रकमेचे डीडी जमा करणे गरजेचे. दि. २१/११/२०२५ तिप्पट शुल्काच्या आलेल्या अजार्साठी व परिवहन संवर्ग वाहनांसाठी आलेल्या डबल अर्जाचा लिलाव दुपारी ०४.०० वाजता. असे प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांनी कळविले आहे.

# भैरवनाथ जन्मोत्सव संपन्न

## कीर्तन सेवा व सप्ताह समाप्तीने भक्तिमय वातावरण



**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातील भीमा नदीच्या तीरावर ती असलेले वाशिंबे जागृत देवस्थान ग्रामदैवत भैरवनाथ महाराज जन्माष्टमी सोहळा उत्साहात संपन्न झाला. अखंड हरिनाम सप्ताह , ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व जन्मोत्सवानिमित्त भव्य सात दिवस कीर्तन सेवा पार पडली. हजारो भक्तांच्या उपस्थितीत हा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात भैरवनाथांच्या मूतींर्ची विशेष पूजा व अभिषेकाने झाली. जन्मोत्सव कीर्तनाची सेवा ह.भ.प. दयानंद कोरेगावकर महाराज यांनी 'भैरवनाथ चरित्र' या विषयावर भावपूर्ण कीर्तन सादर केले. कीर्तनात भैरवनाथांच्या बाललीला, कृपा व चमत्कारांच्या कथा सांगितल्या गेल्या, ज्यामुळे उपस्थित भक्त भावविवश झाले. कीर्तनादरम्यान भक्तांनी टाळ-मृदंगाच्या साथीने भजन गायन केले.

सकाळी ८ आठ वाजल्यापासून विविध कार्यक्रम व दिंडी प्रदक्षिणा विधी पार पडला. काल्याची कीर्तन सेवा वाशिंबाचे सुपुत्र गायनाचार्य ह. भ .प .माऊली महाराज झोळ यांनी अनेक विषयांना स्पर्श करत उपस्थित्यांना ज्ञान अमृत पाजले.त्यांच्या मनात भक्तीची ज्योत प्रज्वलित केली. यावेळी मोठ्या संख्येने महिला वर्ग उपस्थित होता.

सप्ताह मध्ये गावातील भजनी मंडळ यांनी परिश्रम घेतल सेवा केली. सात दिवस अन्नदात्यांकडून अन्नदानाची सेवा केली गेली.मंदिर ट्रस्टने सर्व कार्यक्रम नियोजित पार पाडले. समस्त निमकर परिवाराच्यावतीने महाप्रसाद अन्नदान सेवा पंगत पार पडली.

# मालेगाव मधील मुलीवर झालेल्या बलात्कार व हत्येतील आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा द्या




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संभाजी ब्रिगेड सोलापूर शहर व जिल्ह्याच्या वतीने आज मालेगाव मध्ये झालेल्या चिमुरडी वर झालेल्या बलात्कार व हत्या प्रकरणातील आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी व अशा गुन्ह्यावर अंकुश लावण्यासाठी किंवा परत परत असे गुन्हे महाराष्ट्र काय देशातच घडू नये म्हणून यावर कडक असे कायदे करून अशा आरोपींना कुठलीही दया माया न दाखवता कायद्यामध्ये फाशीची शिक्षा असा गुन्हा घडल्यापासून 30 दिवसाच्या आत देण्यात यावी यासाठी संभाजी ब्रिगेडने आज मालेगाव मधील यज्ञाच्या आरोपीला तात्काळ फाशीचे शिक्षा द्यावी म्हणून तीव्र आंदोलन केले व आरोपीच्या प्रतीकात्मक प्रतिमेला जोडे मारो करून त्याची प्रतिमा पेटवून देण्यात आली . यावेळी भरपूर महिलांनी उग्र आंदोलनाचा इशारा दिला जरी आरोपीला तत्काळफाचे शिक्षा न दिली व असे गुन्हे परत घडू नये म्हणून कायद्यात क तरतूद नाही केली तर संभाजी ब्रिगेड यापुढे सरकारला धारेवर धरल्याशिवाय गप्प बसणार नाही यावेळी मार्गदर्शक बबन अण्णा माने संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले संभाजी ब्रिगेड महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मीनलदास वकील आघाडी एडवोकेट गणेश कदम कार्याध्यक्ष शेखर भोसले शहर व जिल्हा सचिव सिद्धराम सावळे महिला आघाडी शहराध्यक्ष मनीषा कोळी शहर उपाध्यक्ष संतोष सुरवसे महिला आघाडीजिल्हा उपाध्यक्ष संजीवनी सलबत्ते,पूजा कलागाते, राधा घुले, सुनंदा सूर्यवंशी,सुनिता कारंडे, गीता अंजीखाने, विद्या देशमुख, मनीषा डोंगरे, संगीता डोंगरे, सविता मिरगाळे,सिद्धावा हत्यानुर, लक्ष्मी किरंगी व संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# आगामी महापालिका निवडणूक एकत्रितपणे लढविण्याचा निर्धार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पार्टी) आणि भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) या मित्रपक्षांची निवडणूक पूर्वतयारीसाठी समन्वय बैठक हॉटेल सिटी पार्क, सोलापूर येथे पार पडली.

बैठकीस माजी आमदार आडम मास्तर, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, काँग्रेसचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पार्टी), चे अध्यक्ष महेश गादेकर, माजी महापौर संजय हेमगड्डी, माजी महापौर यु. एन. बेरिया, शंकर पाटील, भारत जाधव, अशोक निंबर्गी सर, M.H. शेख, CPM जिल्हा सचिव युसुफ शेख मेजर, माजी नगरसेवक व्यंकटेश कोंगारी, नलिनीताई कलबुर्गी यांच्यासह तीनही पक्षांचे महत्त्वाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी माजी आमदार आडम मास्तर व प्रकाश यलगुलवार यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते व माजी केंद्रीय मंत्री चंद्रकांत खैरे यांच्याशी मोबाईल द्वारे संवाद साधून महाविकास आघाडीच्या मजबूत ऐक्यावर चर्चा केली. सर्व मित्रपक्षांनी महापालिका निवडणूक एकजुटीने लढविण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला.

# सोलापुरात त्रिभाषा धोरण समितीचा जनसंवाद



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत महत्वपूर्ण विचारमंथनासाठी आयोजित त्रिभाषा धोरण समितीची जनसंवाद बैठक नियोजन भवन,सोलापूर येथे उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

या बैठकीस शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि तज्ञांची प्रमुख उपस्थिती लाभली. समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव जागतिक (शिक्षणतज्ञ) यांच्यासह डॉ. वामन केंद्रे (माजी संचालक झ्र नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, NSD), डॉ. अपर्णा मॉरिस (शिक्षणतज्ञ, पुणे), डॉ. सोनल कुलकर्णी-जोशी (भाषा विज्ञान प्रमुख, डेक्कन कॉलेज, पुणे) यांच्या बौद्धिक आणि मार्गदर्शक उपस्थितीने या संवादसत्राचे बैठकीचे महत्त्व अधिक वृद्धिंगत झाले. यावेळी प्रशासनाकडून मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम,शिक्षण उपसंचालक मा.डॉ. गणपत मोरे, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, शिक्षणाधिकारी (योजना) सुलभा वटारे, डायट अधिव्याख्याता गजेंद्र जमादार, बुधाराम इ. उपस्थित होते. विभागीय शिक्षण उप संचालक गणपत मोरे यांनी प्रास्ताविक केले. बैठकीत सामान्य शिक्षणप्रेमी नागरिक, भाषा तज्ञ, विचारवंत, मराठी भाषेच्या हितासाठी कार्य करणाऱ्या विविध संस्था तसेच शासन आणि अशासकीय संस्थांचे पदाधिकारी, पालक-शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी यांनी सहभाग घेऊन आपले मत मांडले. सर्वांचे प्रत्यक्ष संवादातून आलेले विचार मुद्देसूदपणे समितीसमोर मांडले गेले. बैठकीत बोलताना समिती अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांनी स्पष्ट उल्लेख केला. 'सदर त्रिभाषा धोरण समितीची रचना ही पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य (कंपल्सरी) करण्यासाठी करण्यात आलेली नाही. कोणत्याही एका भाषेला जबरदस्ती लादणे हा समितीचा उद्देश नाही. जिल्ह्याची लोकसंख्या, भाषा-वापराचा भूगोल, मुलांचे शैक्षणिक हित आणि पालकांची गरज, इ. या सर्वांचा विचार करून भाषा धोरण ठरविणे हा समितीचा मुख्य हेतू आहे.' तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी भाषणात सांगितले की 'सोलापूर जिल्हा हा बहुभाषिक जिल्हा आहे. येथे विविध संस्कृती आणि भाषा एकत्र नांदतात. त्यामुळे त्रिभाषा धोरण राबविताना स्थानिक भाषिक वास्तव, विद्यार्थ्यांचे सामाजिक वातावरण आणि भाषिक विविधता समजून घेऊन निर्णय घेणे अत्यंत गरजेचे आहे.'

सदर चर्चेमध्ये विविध सदस्यांनी दिलेल्या सूचना आणि मते अतिशय लक्षपूर्वक ऐकत समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांनी प्रत्येक मुद्द्यावर स्वतः हस्तलिखित स्वरूपात नोंदी घेत होते, ज्यावरून या धोरणाबाबतचे विचार किती गांभीर्याने घेतले जात आहेत, याची झलक स्पष्टपणे दिसून येत होती. बैठकीत मांडलेली सर्व मते, सूचना आणि व्यावहारिक दृष्टिकोन समितीकडून संकलित करून त्यावर विचारविनिमय केल्यानंतर धोरणाचा अंतिम अहवाल राज्य शासनाकडे पाठविला जाणार आहे.

सोलापुरातील ही बैठक त्रिभाषा धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दिशेने अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरल्याचे सर्वांनी समाधानाने नमूद केले. सदर जनसंवाद कार्यक्रम शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांचे मार्गदर्शनाखाली सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेऊन महत्वपूर्ण भूमिका बजावली. विस्तार अधिकारी सुहास गुरव यांनी सूत्रसंचालन केले. त्रिभाषा धोरण समितीच्या जनसंवादासाठी सोलापूर जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असल्याने समितीने समाधान व्यक्त केले आहे.

# शिंदे यांच्या यांच्या हस्ते ड्रेनेज लाईन कामाचे भूमिपूजन



**सोलापूर , (कटूसत्य वृत्त):-** स्मार्ट सिटीच्या चुकीच्या आणि निकृष्ट कामामुळे वीर फकीरा चौक न्यू बुधवार पेठ मातंग वस्ती परिसर येथील ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होत होती. परिणामी सांडपाणी रस्त्यावर येऊन परिसरात गंभीर अस्वच्छता निर्माण झाली होती. या परिस्थितीमुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा आणि आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागत होता.

ही समस्या युवा नेते रोहित खिलारे व समाज बांधवांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे मांडल्यानंतर त्यांनी सातत्याने महानगरपालिकेकडे पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळत नवीन ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी 50 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

या निधीतून आज वीर फकीरा चौक न्यू बुधवार पेठ मातंग वस्ती परिसरातील नवीन ड्रेनेज लाईन, घरजोड कनेक्शन तसेच विविध गल्लीझबोळांमध्ये ड्रेनेज पाइपलाईन टाकण्याच्या कामाचा शुभारंभ आणि भूमिपूजन खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मातंग समाजाचे राज्य समन्वयक सुरेश पाटोळे हे होते प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक मनोज यलगुलवार, युवा नेते राजू क्षीरसागर हे उपस्थित होते हे काम सोलापूर महानगरपालिका झ्र लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत होत असून खासदार प्रणिती शिंदे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नामुळे हे ड्रेनेज लाईन काम होत असल्याचे तसेच वीर फकीरा तरुण मंडळास युवकांना व्यायाम साहित्य करिता निधी देण्याचे देखील खासदार शिंदे यांच्याकडे सुरेश पाटोळे व रोहित खिलारे यांनी मागणी केली ती मागणी खासदार प्रणिती ताई शिंदे यांनी तात्काळ मान्य करून येणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये व्यायाम साहित्य देण्याचे जाहीर केले. स्थानिक रहिवाशांनी दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या समस्येवर उपाययोजना झाल्याने समाधान व्यक्त केले आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू क्षीरसागर व प्रास्ताविक युवा नेते रोहित खिलारे यांनी व आभार सीमा खिलारे यांनी मांडले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाज बांधव यांनी परिश्रम घेतले.

# निर्धन व दुर्बल घटकातील रूग्णांसाठी जिल्ह्यातील 17 धर्मादाय रूग्णालये कार्यरत

**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** सोलापूर धर्मादाय रुग्णालय जिल्हास्तरीय समितीची बैठक दि.06 नोव्हेंबर 2025 रोजी अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, सोलापूर कुमार आशीर्वाद, यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेली असून . सदर बैठकीत धर्मादाय रुग्णालयात निर्धन व दुर्बल घटकातील रूग्णासाठी असलेली योजना व त्याची अंमलबजावणीबाबत उपाययोजना करणेबाबत सविस्तर बैठक पार पडली. सदर बैठकीत मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेली योजना व सोलापूर जिल्हयातील धर्मादाय रुग्णालयाची यादी नागरिकांना माहिती व्हावी व त्याचा व्यापक प्रसार व्हावा याकरीता जिल्हयातील वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

मा. उच्च न्यायलय, मुंबई यांचे रिट याचिका (पी.आय.एल.) क्र. 3132/2004 मधील दि.17 ऑगस्ट 2006 व 15 एप्रिल 2009 आदेशाप्रमाणे धमार्दाय रुग्णालयांनी अंमलात आणावयाची योजना महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये ज्यांची सार्वजनिक न्यास म्हणून नोंद झालेली आहे व सदर धर्मादाय न्यास जे धर्मादाय रुग्णालय ज्यामध्ये सुश्रुषालय / प्रसुतीगृह दवाखाना किया वैद्यकीय मदत देणारे केंद्र चालवित आहे व ज्यांचा वार्षिक खर्च हा वैद्यकीय कारणास्तव पाच लाख रुपयापेक्षा जास्त आहे असे न्यास कलम 41 AA च्या अंतर्गत शासकिय अनुदानित सार्वजनिक न्यास म्हणून समजले जातील. वरील कलम 1 अंतर्गत येणाऱ्या न्यासाबाबत त्यांनी वैद्यकिय केंद्रात कार्यान्वित असलेल्या खाटांच्या संख्येपैकी एकूण 10 टक्के खाटा निर्धन व 10 टक्के खाटा दुर्बल घटकातील रुग्णांसाठी (एकूण खाटांपैकी 20 टक्के खाटा) आरक्षित ठेवल्या जाऊन सदर रुग्णाकरीताच राखून ठेवल्या पाहीजेत.

धर्मादाय रुग्णालयांनी खाली नमुद सेवा निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना मोफत दिल्या जातात 1) खाटा 2) निवासी वैद्यकिय अधिकार सेवा 3) सुश्रुषा 4) अन्न (जर पुरवित असेल तर) 5) कापड 6) पाणी 7) विज 8) नित्य निदान विषयक सेवा इतर सर्वसामान्य सेवा, ज्या रुग्णांचे वार्षिक उत्पन्न रु.1,80,000/- (एक लाख ऐंशी हजार रुपये) च्या आत आहे असे रुग्णांना निर्धन रुग्ण म्हणून संबोधले जाते. अशा रुग्णांना वैद्यकिय तपासणी, उपचार व औषधे मोफत दिले जातात. ज्या रुग्णांचे वार्षिक उत्पन्न रु.3,60,000/- (तीन लाख साठ हजार रुपये) च्या आत आहे असे रुग्णांना दुर्बल घटकातील रुग्ण म्हणून संबोधले जाते, अशा रुग्णांना वैद्यकिय तपासणी व उपचार 50 टक्के सवलतीच्या दरात दिली जाते.

औषधे, उपयोगात आणलेल्या वस्तू व शरीराच्या आत लावलेल्या वस्तू यांचा आकार हा रुग्णालयांनी केलेल्या खरेदीच्या किंमतीत लावण्यात येतो. मात्र सदर रुग्णास या वस्तूची 50 टक्के किंमत द्यावी लागते.

रुग्णांनी उत्पन्नांच्या पुराव्यासाठी मा. तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला किंवा पिवळी/केशरी शिधापत्रिका (रेशनकार्ड) यापैकी एक दस्तऐवज संबंधीत धमार्दाय रुग्णालयात सादर करावा. धर्मादाय रुग्णालयांतील निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांवर उपचार करण्यास कसुर/टाळाटाळ केल्यास मा. धमार्दाय उप आयुक्त, सोलापूर यांच्या सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड विल्डिंग, पहिला मजला, उत्तर बझार, सोलापूर-413003 या कार्यालयात लेखी तक्रार किंवा दुरध्वनी क्र.0217-2318001 किंवा हेल्पलाईन क्र. 1800222270 येथे नोंदवावी. सोबत -रुग्णालयांची यादी.

अशी माहिती धर्मादाय उप आयुक्त, (प्रतिनियुक्त न्यायाधीश) ईश्वर कां. सुर्यवंशी यांनी दिली आहे.

निरामय पॅरालिसिस सेंटर

निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अ‍ॅण्ड फिजिओथेरपी सेंटर

ISO 9001:2015

NGO DARPAN

खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये

कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार



नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था

मोबाईल नं. 9503310568

पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

विकणे /भाड्याने देणे आहे

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

संपर्क : डी. बी. शिंदे

मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३

पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला